



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २८ ऑगस्ट १९४६ अंक ३५


## —: साठे बिस्किटें :—

क्रूसबरी, ऑरेंज, फॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

आंध खादीचे ( म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे ) —एकमेव विक्रेते—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**डोंगरे** यांच्या **बालामृतानें** अशक्त मुलें सशक्त होतात

**सांडू प्रेग युटेरो**
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमीटेड (मेंबर)








पुणें चीफ एजंटः—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

डॉ. गोवंड यांचे **ज्वरबिंदू**

उत्तम आणि कन्हर



**पंढरीनाथ** ब्रिलिअन्टाईन वापरा



## विविध माहिती

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.च्या दोन नव्या शाखा**—महाराष्ट्र बँकेच्या धुळें व सोलापूर शाखांचें उद्घाटन मंगळवार, ता. २० रोजीं झालें.

**श्री. नाईक ह्यांची कोल्हापुरांत नवी कंपनी**—रेशमाच्या धंद्यांतील अनुभवी व यशस्वी कारखानदार श्री. नारायणराव नाईक ह्यांच्या नेतृत्वाखालीं कोल्हापूर सिल्क इंडस्ट्रीज लि. नांवाची एक कंपनी स्थापन होत आहे. विक्रीस काढावयाच्या ५ लक्ष रुपयांच्या भांडवलापैकीं १०% भांडवल कोल्हापूर संस्थान घेणार आहे. म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि., श्रीराम सिल्क मिल्स लि., बाँबे सिल्क फिलेचर्स लि. इत्यादींशीं श्री. नाईक ह्यांचा असलेला निकट संबंध सुप्रसिद्ध आहे.

**टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें ३१ मार्च, १९४६ अखेर संपलेल्या वर्षी २० कोटि, ८४ लक्ष रुपयांची विक्री केली. तिनें ४ कोटि रुपये मजुरीसाठीं दिले. ३½ कोटि रुपयांची करासाठीं तरतूद केली. ५० लक्ष रुपये कामगारांत बोनसचे दिले. निव्वळ नफा ३ कोटि १२ लक्ष रुपये उरला.

**आर्थिक परिषद्**—डिसेंबर अखेर कराची येथें अखिल भारतीय आर्थिक परिषद् भरणार आहे. संयुक्त प्रांत सरकारचे आर्थिक सल्लागार प्रो. रुद्र यांची सदर परिषदेच्या अध्यक्षस्थानीं योजना झाली आहे. मुंबई येथील प्रो. अंजारिया यांचे अध्यक्षतेखालीं आर्थिक-शेतकी परिषद् भरवावी असेंही घाटत आहे.

**इंटरनॅशनल बँक**—'इंटरनॅशनल बँक ऑफ इंडिया'चा बँकिंगचा धंदा थांबल्यामुळें, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ला जोडलेल्या शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून त्या बँकेचें नांव कमी केलें आहे, परंतु नवीन व्यवस्थेखालीं त्या बँकेची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत असें कळतें. रिझर्व्ह बँकेनें वरील बँकेची तपासणी केल्यानंतर, नवीन ठेवी न स्वीकारण्याचा तिला तुकताच हुकूम केला होता.

**छापखाने व विक्री-कर**—छपाईची किंमत ही केलेल्या कामाचा मोबदला आहे, मालाचा नव्हे, म्हणून फक्त छपाईमुळें झालेली पैशांची उलाढाल ही विक्रीकर कायद्याच्या कलम २ (जे) नें केलेल्या अर्थाच्या कक्षेंत बसत नाहीं. तरी मालाची विक्री किंवा पुरवठा न करतां फक्त छपाईचेंच काम जर छापखान्यांत होत असेल तर विक्री-कर कायद्यान्वयें अशा छापखान्याची नोंदणी करण्याची जरूरी नाहीं असें सरकारी निवेदनावरून समजतें.

**पुढील वर्षी अधिक केरोसीन**—युद्धसमाप्तीनंतरहि हिंदुस्थानच्या केरोसीनच्या पुरवठ्यांत सुधारणा झाली नाहीं याचें एक कारण सांठवण्याच्या साधनांचा अभाव हें आहे असें कळतें. जपानी युद्ध लांबेल अशा कल्पनेनें पुष्कळशा टाक्यांतून हवाई जहाजांना लागणाऱ्या स्पिरिटचा सांठा करण्यांत आला, परंतु युद्ध अकस्मात् संपल्यामुळें या स्पिरिटची विल्हेवाट लावून टाक्या साफ करतां आल्या नाहींत. आतां हिंदुस्थान सरकारनें आंखलेल्या योजनेला अनुसरून येत्या दोन-तीन महिन्यांत हें शिलकी स्पिरिट संपविलें जाऊन, नव्या वर्षाच्या सुरवातीस केरोसीनच्या पुरवठ्यांत सुधारणा होईल.


# गव्हर्नमेंट ऑफ इंडिया

## ३॥ टक्क्याच्या बिनफेडीच्या कर्जांत बदल

**मुदतः—१५ ऑगस्ट १९४६ पासून १६ सप्टेंबर १९४६ पर्यंत**

**( दोनही दिवस धरून )**

( १ ) ३॥ टक्याचे १८४२–४३ चे कर्जरोखे
( २ ) ३॥ टक्याचे १८५४–५५ चे कर्जरोखे
( ३ ) ३॥ टक्याचे १८६५ चे कर्जरोखे
( ४ ) ३॥ टक्याचे १८७९ चे कर्जरोखे
आणि ( ५ ) ३॥ टक्याचे १९००–०१ चे कर्जरोखे

( गव्हर्नमेंट नोटीस नं. डी. / ४७६६–बी/४६, २४ मे १९४६ प्रमाणें परतफेडीसाठीं जाहीर झालेले )

धारण करणारांना ( १ ) १९४६ चे ३ टक्याचे ( दर्शनी ) १०० रु. किंमतीबद्दली १०० रु. किंमतीचे कर्जरोखे किंवा ( २ ) ( दर्शनी ) १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्याबद्दली ९९ रु. किंमतीचे कर्जरोखे घेतां येतील.

३ टक्यांचे १९४६ चे बदली कर्जरोख्यांची १६ सप्टेंबर १९८६ पर्यंत परतफेड होऊं शकणार नाहीं. आणि हे कर्जरोखे धारण करणाराला ४० वर्षेंपर्यंत ३ टक्के व्याज मिळण्याची हमी दिली जाईल.

रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील शाखेमध्यें आणि इतरत्र इंपीरियल बँकेच्या शाखेंत व सर्व ठिकाणीं सरकारी तिजोरीमध्यें अर्ज घेतले जातील.

सविस्तर माहितीसाठीं यापैकीं कोणत्याही कचेरीस, शाखेस किंवा तिजोरीस लिहा.

( हिंदुस्थान सरकारच्या फायनान्स खात्याचें प्रकाशन )

# अर्थ

बुधवार, ता. २८ ऑगस्ट १९४६






प्रो. वा. गो. काळे

संपादक

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. · किरकोळ अं. २ आणे.


# रिझर्व्ह बँकेचा नफा

## स्टर्लिंगमधील वाढती गुंतवणूक व तीवरील उतरता व्याजाचा दर

हिंदी रिझर्व बँकेस ३० जून १९४६ अखेर संपलेल्या वर्षी २½ कोटि रुपयांचा खर्च वजा जातां १३ कोटि, ६३½ लक्ष रुपये नफा उरला, हें वृत्त वाचून, " रिझर्व बँकेस नफा कसा मिळतो ? " अशी कित्येकांनीं शंका विचारली आहे. व्यापारी बँका ठेवी पत्करून त्या व्याजीं लावण्याचा धंदा करतात तसा धंदा रिझर्व बँक करीत नाहीं. त्यामुळें रिझर्व बँकेच्या नफ्याचा प्रचंड आकडा एकदम डोळ्यांत भरतो. १९३९ सालीं रिझर्व्ह बँकेस २२½ लक्ष रुपये नफा होऊन त्यांपैकी भागीदारांस १७½ लक्ष रुपये मिळाले होते व सरकारच्या वांट्यास ५ लक्ष रुपये गेले होते. नुकत्याच संपलेल्या वर्षाचे आकडे पाहिले, तर भागीदारांस २० लक्ष रुपये मिळाले असून मध्यवर्ती सरकारास १३ कोटि, ४३½ लक्ष रुपये मिळाले आहेत !

रिझर्व्ह बँक जेव्हां चलनी नोटा काढते, तेव्हां ती आपल्या इश्यू खात्यांतील जिंदगीचे आधारावर त्या काढते. म्हणजे जसजशी चलनवाढ होईल, त्या प्रमाणांत रिझर्व्ह बँकेजवळील रोखे व इतर तारण हीं वाढत जातात. ह्या रोख्यांवर व्याज मिळतें, तें रिझर्व्ह बँकेच्या उत्पन्नखातीं जमा होतें. रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याचा जून १९४६ अखेरचा ताळेबंद पाहिला, तर जिंदगीचे बाजूस त्यांत ४४ कोटि, ४१½ लक्ष रुपयांचें सोनें आहे आणि १६ कोटि, ५० लक्ष रुपये रुपयाच्या नाण्यांचे स्वरूपांत आहेत. ( ह्यांत रुपयावाल्या नोटांचाहि समावेश होतो. ) ह्या दोन्हींवर अर्थात् कांहीं व्याज मिळूं शकत नाहीं. परंतु रिझर्व्ह बँकेजवळील ११३५½ कोटि रुपयांचे स्टर्लिंग रोखे व ५७¾ कोटि रुपयांचे हिं.सरकारचे रोखे ह्यांवर मात्र रिझर्व्ह बँकेस व्याज मिळत रहातें. १९३५–३६ मध्यें रिझर्व बँकेजवळ ४४ कोटि, ४२ लक्ष रुपयांचें व्याज न देणारें सोनें होतें, त्यांत आज तागायत वाढ झालेली नाहीं. तथापि हिं. सरकारचे रोखे त्यावेळीं २९ कोटि, ६२ लक्षांचे होते ते ३० जून १९४६ रोजीं ५७ कोटि, ८४ लक्षांचे झाले आहेत आणि स्टर्लिंगमधील रोखे ६२ कोटि रुपयांचे ११३५ कोटि रुपयांवर गेले आहेत. चलनाची वाढ करतांना, रिझर्व बँकेस सोन्याचें मजबूत परंतु बिनव्याजी, तारण वाढवावें लागलें नाहीं; नवें सर्व तारण व्याज देणाऱ्या रोख्यांच्या स्वरूपांतीलच आहे, चलनवाढीमुळें रिझर्व्ह बँकेजवळील रोख्यांचा संचय फुगत चालला व त्यांचें व्याज रिझर्व्ह बँकेचा नफा वाढविण्यास कारणीभूत झालें. सरकारलाहि त्यांत फार मोठा वाटा मिळाला.

रिझर्व बँकेचा नफा प्रचंड दिसत असला, तरी १९४४–४५ चे मानानें १९४५–४६ मधील नफा कमीच आहे. त्याचें कारण बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं नुकतेंच विशद करून सांगितलें. बँकेनें काढलेल्या चलनी नोटांत वाढ होत असतांना व त्याकारणानें व्याज देणारे रोखे इश्यू खात्यांत अधिकाधिक जमा होत असतांना, बँकेच्या नफ्याचा आकडा कमी झाला, ह्याचा खुलासा सर चिंतामणराव ह्यांनीं केला. ३० जून, १९४५ रोजीं रिझर्व्ह बँकेच्या इश्यू व बँकिंग खात्याचें ग्रेट ब्रिटनमधील एकूण येणें ( स्टर्लिंगमधील गुंतवणूक व रोख रकमा ) १४२२ कोटि रुपये होतें, तें ३० जून १९४६ रोजीं १६९४ कोटि रुपयांवर गेलें. म्हणजे, त्यांत २७२ कोटींची वाढ झाली. असें असूनहि वसूल व्याजांत घटच पडली. ह्याचें कारण, ग्रेट ब्रिटनमधील व्याजाचे उतरते दर, हें होय. ट्रेझरी डिपॉझिट रिसीट्स व ट्रेझरी बिलें ह्यांत गुंतलेल्या रिझर्व बँकेच्या रकमांवर व्याज कमी मिळालें. बँकेच्या व्यवस्था खर्चांत ५६.७% वाढ झाली, याचाहि नफ्याचे आकड्यावर प्रतिकूल परिणाम झाला. अल्प मुदतीच्या रोख्यांवरील व्याजाचे दर शक्य तितके कमी राखण्याचें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे. त्यामुळें, हिंदुस्थानप्रमाणें ग्रेट ब्रिटनच्या इतर सावकारांसहि आपल्या येण्यावर मिळणाऱ्या अत्यंत थोड्या व्याजावर समाधान मानावें लागत आहे. हिंदुस्थान सरकारनें संयुक्त राष्ट्रांतर्फे युद्धखर्च केला त्यासाठी त्याला पैसा उभारावा लागला. ह्या कर्जावर हिंदुस्थान सरकारास ज्या दरानें व्याज द्यावें लागतें, त्यामानानें रिझर्व्ह बँकेस ग्रेट ब्रिटनमध्यें मिळणारा व्याजाचा दर अत्यल्प आहे. हिंदुस्थान सरकारनें रुपयाचें चलन पुरवून युद्धखर्च केला व त्याचें येणें ग्रेट ब्रिटनमध्यें साठूं दिलें. त्याऐवजीं, ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानांतच कर्ज उभारलें असतें, तर नुकसानकारक व्याजाचा दर पत्करण्याची पाळी हिंदुस्थानावर आज आली नसती. हिंदुस्थानावर एक प्रकारें सक्तीची सावकारी लादली गेली आणि त्यांत निर्माण होणारें येणें ग्रेट ब्रिटनमध्यें गुंतून पडलें आहे. तें वसूल होईपर्यंत व्याज म्हणावें तर तेंहि समाधानकारक मिळत नाहीं. रिझर्व्ह बँकेस दीर्घ मुदतीच्या ब्रिटिश कर्जरोख्यांत रकमा गुंतविण्यास परवानगी देणारी दुरुस्ती रिझर्व्ह बँक कायद्यांत करण्यांत यावी, असें सुचविण्यांत येत आहे. आजच्या कायद्याप्रमाणें १० वर्षांपेक्षां जास्त मुदतीचे ब्रिटिश कर्जरोखे रिझर्व्ह बँकेस घेतां येत नाहींत. आज रिझर्व्ह बँकेच्या नोटांस स्टर्लिंग रोख्यांचेंच मुख्य तारण असल्याकारणानें, हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांतील तिची गुंतवणूक वाढविण्याचा बँकेस अधिकार मिळाला तरी त्याचा उपयोग होण्याजोगा नाहीं. अर्थात् स्टर्लिंगमधील वसुलीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा असून, त्या वसुलीच्या तपशीलावर बँकेच्या इश्यू खात्यांतील जिंदगीची बाजू बरीच अवलंबून राहील हें उघड आहे. खालील तक्त्यांत रिझर्व्ह बँकेच्या नोटा म्हणजे तिचें देणें सालोसाल कसें वाढत गेलें, त्या नोटांस तारण असलेलें सोनें कसें स्थिर राहिलें, हिं.सरकारच्या रोख्यांत फारच थोडी वाढ कशी झाली परंतु स्टर्लिंग रोख्यांतील गुंतवणूक कशी फुगत गेली, आणि त्याचा बँकेच्या नफ्यावर कसा परिणाम होत गेला, हें तुलनात्मक आकड्यांच्या सहायानें दर्शविलें आहे.

| शुक्रवारच्या आकड्यांची सरासरी | देणें | जिंदगी | | | | नफा |
|---|---|---|---|---|---|---|
| | चलनी नोटा | सोने | स्टर्लिंग रोखे | रुपये | हिं. सरकारचे रोखे | |
| | कोटि रु. | कोटि रु. | कोटि रु. | कोटि रु. | कोटि रु. | लक्ष रु. |
| १९३५–३६ | १९२ | ४४·४२ | ६२ | ५५ | ३० | ५३ |
| १९३६–३७ | २०२ | ,, | ७० | ६४ | २४ | २८ |
| १९३७–३८ | २१३ | ,, | ८० | ६० | २७ | ३८ |
| १९३८–३९ | २११ | ,, | ६७ | ६७ | ३२ | २३ |
| १९३९–४० | २२८ | ,, | ७९ | ६८ | ३७ | २९ |
| १९४०–४१ | २५९ | ,, | १३० | ३६ | ४८ | २७९ |
| १९४१–४२ | ३२० | ,, | १६५ | ३५ | ७५ | ३४१ |
| १९४२–४३ | ५२५ | ,, | ३१९ | २२ | १३९ | ७७० |
| १९४३–४४ | ७८८ | ,, | ६४४ | १४ | ८५ | १०२७ |
| १९४४–४५ | ९८० | ,, | ८६८ | १४ | ५८ | १४९० |
| १९४५–४६ | ११७९ | ,, | १०६१ | १६ | ५८ | १३६३ |
| ९-८-१९४६ | १२५५ | ,, | ११३५ | १८ | ५८ | |
| १६–८–४६ | १२५६ | ,, | ११३५ | १८ | ५८ | |

## युवर ओन प्रॉव्हिडंट इं. कं. लि.

वरील कंपनीचा १९४५ अखेरचा रिपोर्ट व ३१ ऑक्टोबर १९४५ अखेरच्या मूल्यमापनाचा ॲक्चुअरीचा रिपोर्ट आमचेकडे आला आहे. कंपनीनें आपलें मूल्यमापन सुप्रसिद्ध ॲक्चुअरी श्री. गो. श्री. दिवाण ह्यांचेकडून करवून घेतलें आहे. कंपनीच्या स्थापनेपासून तिला आतांपर्यंत मृत्यूमुळें आलेल्या एकाहि क्लेमची रक्कम द्यावी लागलेली नाहीं. ३% दर गृहीत धरून मूल्यमापन केलें त्यांत २५९ रु वाढावा आढळला तो विमेदारांत न वाटतां पुढें ओढण्यांत आला आहे. कंपनीचे मॅ. डायरेक्टर श्री. कोल्हटकर ह्यांनीं कांहींहि वेतन घेतलें नाहीं त्यामुळेंच मुख्यतः हा वाढावा दिसूं शकला ही गोष्ट श्री. कोल्हटकरांच्या स्वार्थत्यागाची निदर्शक आहे ह्या स्वार्थत्यागामुळें कंपनीच्या भरभराटीस जोराची चालना मिळेल, हें उघड आहे. " व्याज ज्यास्त मिळण्याचा प्रयत्न करा, परंतु सुरक्षिततेस बाध आणूं नका; खर्चाचें प्रमाण कमी करा; शक्य तेथें प्रीमियमचे दर वाढवा" असा ॲक्चुअरींचा सल्ला आहे. तो सर्वच विमा कंपन्यांस लागू आहे. न्यू सिटिझन बँकेचे श्री. डी. डी. देशपांडे हे कंपनीचे अध्यक्ष व वेस्टर्न इंडियाचे श्री. चिरमुले हे कंपनीचे सल्लागार आहेत. हे दोघेहि विमा व्यवसायांतील तज्ञ व अनुभवी गृहस्थ असल्याकारणानें, कंपनीचें धोरण नेहमी पायाशुद्ध राहील असा विश्वास वाटतो. विमा कंपन्यांस १,००० रुपयांखालील विमे स्वीकारण्याची बंदी असल्याकारणाने, प्रॉव्हिडंट कंपन्यांच्या प्रगतीस चांगली संधि निर्माण झाली आहे तिचा फायदा "युवर ओन" ला मिळण्याजोगा आहे. कंपनीकडील चालू कामांत वाढ होईल त्या प्रमाणांत खर्च वाटला जाऊन तिचा भक्कमपणा वाढेल हें उघड आहे.

---

## बार्शी सें. को. बँक लि.

वरील बँकेचें शेअरभांडवल ७१, ७९० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ८७,४७४ रुपयांचे आहेत. ठेवींत १,६०,३०० रुपयांची वाढ होऊन एकूण ठेवींची रक्कम ११ लक्ष, २१ हजार रुपये झाली आहे. एकुण कर्जव्यवहार थोडा कमी झाला आणि बँकांतील ठेवी व रोख्यांतील गुंतवणूक ह्यांत वाढ झाली. थकबाकी ८ हजारांनीं उतरून ती २७,७२७ रु. वर आली आहे. वैराग शाखेचें काम समाधानकारक चाललें आहे. येडशी पे ऑफिसचा स्थानिक लोकांना उपयोग होत आहे. १९४५–४६ सालीं बँकेस ५,१२६ रुपये निवळ नफा झाला. ५ % डिव्हिडंडला ३,६०० रुपये लागतील. अशा रीतीनें श्री. ग. रा. साने, वकील ( चेअरमन ) व श्री. र. पु. पटवर्धन C. A. I. I. B. ( मॅनेजर ) ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेचें काम समाधानकारक चालू आहे.


## कुर्ला ब्राह्मण सेवा–संघ सहकारी भांडार लि.

वरील सहकारी भांडाराचे १६१ सभासद असून वसूल भांडवल २,७१० रु. आहे. गेल्या वर्षी दरमहा सरासरी विक्री १,१२६ रु. होती, ती आतां १,४६९ रु. झाली आहे. निवळ नफा ५६० रु. उरला. त्यापैकीं फक्त ९३ रुपयांचा विनियोग डिव्हिडंड वांटण्याकडे करण्यांत यावयाचा आहे. खरेदी मालावर रुपयास ४ पै प्रमाणें बोनसला २७६ रुपये लागतील. भांडाराचा मुख्य उद्देश डिव्हिडंड वांटणें हा नाहीं, हें ध्येय चालकांचे पुढें आहे. भांडार " अ " वर्गांत असून योग्य दिशेनें त्याची प्रगति होत आहे.

---

## दि सांगली बँक लि.

वरील बँकेस १९४५ सालीं ५१,६७३ रुपये निवळ नफा झाला. गेले सालचे ताळेबंदांतील एकंदर नफा ३८,१६० रुपये होता. बँकेचें वसूल भांडवल २ लक्ष रुपये असून रिझर्व व इतर फंड आतां २ लक्ष १३ हजारांवर गेले आहेत. भागीदारांस ७%+३% करमाफ डिव्हिडंड मिळालें. बँकेनें आपलें वसूल भांडवल ५ लक्ष रुपये करून रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेडयूलमध्यें प्रवेश करावयाचें योजिलें आहे.



सारस्वत
को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३०–६–१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,४७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,८५,००० |
| ठेवी ... | रु. ६५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७१,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम
व्याज : २ टक्के
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा
व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी
सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
☞ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ☜
९६ नारायण पेठ, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




महाराष्ट्र एजंटः—मे. जयप्रकाश आणि कं., २५५।४ सदाशिव पेठ, पुणें
( गांवोगांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत. )

## विविध माहिती

**नवीं शेतकी कॉलेजें**—मुंबई प्रांतांत लवकरच दोन नवीं शेतकी कॉलेजें सुरू होणार आहेत. म्हणजे, सध्यां पुणें येथें असलेलें शेतकी कॉलेज धरून एकंदर तीन कॉलेजें होतील. एक कॉलेज बेळगांव जिल्ह्यांत किंवा विजापूर जिल्ह्यांतील बागलकोट शहरीं सुरू होईल. आनंद ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटचें कॉलेजांत रूपांतर करण्याचें घाटत आहे, तें दुसरें कॉलेज होईल.

**बँक-नोकरांची संपाची धमकी**—बँक-नोकरांच्या फेडरेशनला जोडलेल्या १६ युनियन्सनीं, फेडरेशनच्या आज्ञेनुसार आपआपल्या अधिकारी मंडळीस संपाच्या नोटिसा दिल्या आहेत. आणखी १७ बँक युनियन्सनीं संपाच्या नोटिसा आतां दिल्या असतील. बँक-नोकरांच्या युनियन्सच्या सभासदांची संख्या जवळ जवळ २५,००० आहे, व हा संप सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत सुरू होईल असें दिसतें. पुढील बँकांना संपाच्या नोटिसा मिळाल्या आहेतः— लॉईड्स बँक, ग्रिंडले आणि कंपनी ( बँकिंग शाखा ), अलाहाबाद बँक, युनियन बँक, पंजाब नॅशनल बँक, हिंदुस्थान कमर्शिअल बँक, बँक ऑफ जयपूर, बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका, कलकत्ता नॅशनल बँक, नॅशनल सेव्हिंग्ज बँक, कॅनरा बँक आणि लक्ष्मी बँक. कारकुनांचा पगार ८० रु. पासून सुरू होऊन २५ वर्षांत तो ४०५ रु. पर्यंत व त्यापुढील १० वर्षांत ६०५ रु. पर्यंत जावा आणि खालच्या दर्जाच्या नोकरांचा पगार ४० रु. पासून २८ वर्षांत १५० रु. पर्यंत वाढत जावा अशीं पगाराचीं नवीं प्रमाणें मागण्यांत आलीं आहेत.

**भीक मागण्याचा प्रघात बंद**—भीक मागण्याचा प्रघात बंद पाडण्याकरतां, अफगाण सरकारनें सर्व भिकाऱ्यांना काबूल येथील कारखान्यांतून कामावर नेमण्याची योजना केली आहे. केलेल्या कामाबद्दल भिकाऱ्यांना मजुरी दिली जाईल.

**राष्ट्रीय प्रयोग शाळा**—पुणें व दिल्ली येथें संशोधनकार्याकरतां उभारण्यांत येणार असलेल्या राष्ट्रीय प्रयोग शाळांच्या इमारतींच्या बांधकामानिमित्त, मुंबईचे प्रसिद्ध शिल्पशास्त्रज्ञ श्री. मूटा हे नुकतेच हवाई मार्गानें इंग्लंडला रवाना झाले. असल्याच प्रयोगशाळांच्या इमारतीच्या बांधणीची माहिती मिळविण्याकरतां, तिकडे तीन आठवडेपर्यंत राहून नंतर ते अमेरिकेस जावयास निघतील. ह्या प्रयोगशाळा स्थापण्याकरतां हिंदुस्थान सरकारनें २५ लाख रुपये मंजूर केले आहेत.

**ब्रह्मदेशाचें स्वतंत्र चलन**—येत्या एप्रिलपासून ब्रह्मदेशाचें स्वतःचें स्वतंत्र चलन राहील. त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या मंडळाच्या पांच सभासदांपैकीं दोघे ब्रह्मी असतील. ऑक्टोबरमध्यें लंडन येथें ह्या मंडळाची स्थापना होईल. ब्रह्मी रुपयाची ब्रिटिश पौंडांतील किंमत हिंदी रुपयाइतकीच रहाणार आहे. ब्रह्मी चलनाची व्यवस्था, गव्हर्नरचे प्रतिनिधि या नात्यानें सध्यां रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया पाहत आहे.

**परदेशीय परिचारिकांचें अमेरिकेंत शिक्षण**—चीन, झेकोस्लोव्हाकिया, इटाली, पोलंड व युगोस्लाव्हिया ह्या देशांतून सुमारें १०० परिचारिका, 'अनरा' कार्यक्रमानुसार शिक्षण घेण्याकरतां, न्यूयॉर्क शहरीं येतील असें वॉशिंग्टन येथून १७ ऑगस्ट रोजीं जाहीर करण्यांत आलें आहे. ऑस्ट्रिया व ग्रीसमधील ४० परिचारिकांना अशाच प्रकारचें शिक्षण इंग्लंडमध्यें मिळेल.

**युद्धपूर्व रेल्वे वहातूक**—बंद केलेल्या सर्व युद्धपूर्व आगगाड्या येत्या एप्रिलपासून पुन्हां चालू करतां येतील अशी आशा, रेल्वे चीफ कमिशनर इमर्सन यांनीं मध्यप्रांत वऱ्हाड चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी समितीसमोर प्रदर्शित केली. युद्धखात्याकडे असलेल्या ९०० ब्रॉड गेज डब्यांपैकीं गेल्या दोन महिन्यांत १०० डबे परत आले आहेत. तसेंच रेल्वेच्या कारखान्यांत नवीन डबे तयार करण्याचें काम चालू आहे. तेव्हां पुढील वर्षी निदान तिसऱ्या वर्गाचे ५०० डबे उपयोगास येतील, आणि मग वाहतुकीची परिस्थिति पुष्कळ सुधारेल.

**टायर्सकरतां रबर**—ग्रेट ब्रिटनमध्यें कृत्रिम रबराची आयात बंद झाली आहे. ऑक्टोबरनंतर टायर्स तयार करण्याकरितां स्वाभाविक रबर तेथें वापरलें जाईल.


तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल
पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल!
याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्यकर्तव्य ठरतें.
तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी
येथील सुप्रसिद्ध
कॉमनवेल्थ
विमा कंपनी लि.,
येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.
एजन्सीसाठीं आजच लिहा अगर भेटा
ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष
व
एस. एम जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर







वर्ग पुस्तकें बंद
टाटा पॉवर १२।८।४६
आन्ध्रा व्हॅली २८।८।४६

# मुंबई शेअर बाजार
(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याजवजा
इंदूर माळवा रु. ४१–०–० दि. ३–९–४६
टाटा डिफर्ड रु. १२९-८-९ } दि.१०–९–४६
,, ऑ. रु. २३–०–० }
कोहिनूर रु. १२ दि. १७–९–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २०।८।४६ | बुधवार २१।८।४६ | गुरुवार २२।८।४६ | शुक्रवार २३।८।४६ | सोमवार २६।८।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | | ३६१७—८ | | ३४१५—० |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | | ६३१—८ | | ५९२—४ |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | | ३२७७—८ | | ३१५५—० |
| ७०२; ५६६ | १२–०–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | | | ११७० – ० | | १०६०—० |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | | | ९६०—० | | ८६५—० |
| ४४३–८; ३६० | ५–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | | | ५०५—० | | ४६५—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | | | ४८९—० | | ४१०—० |
| ३३५; २८३-८ | ८–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | | | ५५०—० | | ४८५—० |
| ३३७; २४३ | ९–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | बाजार बंद | बाजार बंद | ६६०—० | बाजार बंद | ४७२—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | | | ६—०–६ | | ५–११–० |
| १७१०; १३-६-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | | २७—१४ | | २६—२ |
| ३-१०; २९ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | | | ६—२ | | ५—११ |
| ७९०; ६४५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | | ९८०—८ | | ८८७—८ |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | | २६५—० | | २५५—८ |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | | ३५०—० | | ३०८—० |
| ५९२-८; ५१०-८ | ७—०–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | | ८७२-८-८ | | ७८०—० |
| ४३-७; ३०-१२ | ०–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १० | | | ५४—१२ | | ५२—२ |

गुरुवार दि. २९।८।४६ ते १।९।४६ पर्यंत बाजार बंद आहे.

सोमवार दि. २६–८–४६ चे भाव

| बँका | | बीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | २०५–० | आंध्रा व्हॅली | १९७०–० | अलकॉक | ६५८–१२ |
| सेंट्रल | १२९–८ | बॉम्बे ट्रॅम | १४२–० | बॉम्बे स्टीम | ७९५—० |
| इंडिया | २५४-८ व्या. व. | टाटा हायड्रो | २२९–० | न्यू इंडिया | ११०—० |
| इंपी० | २९८०–० | टाटा पॉवर | १९९०–० | शिवराजपुर | ५७—० |
| | ७४०–० | | | टाटा केमिकल | २५–१२ |
| रिझर्व्ह | १५९–० | | | टाटा ऑईल | १२५—८ |

पॉटरी कारखान्याच्या उभारणीसाठी ठेवी घेणें आहेत
## त्रिप्ला कमर्शिअल कं. लि.
सरस्वती–विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.
ठेवींचे दर
एक वर्ष–४½%; तीन वर्षें–५%; पांच वर्षें–६%. अर्जाचा नमुना व माहितिपत्रक मागवा.
**सोमण रानडे ॲण्ड को.**
मॅनेजिंग एजण्टस.

### रुरल प्रॉडक्टस कंपनीची प्रगती

महाराष्ट्रांतील प्रादेशिक नियोजनावर भर देणाऱ्या लि. कंपन्यांतील प्रमुख अशी रूरल प्रॉडक्टस कंपनी लि. ही टप्याटप्यानें नवीन नवीन पल्ले गांठीत आहे. मागील १० वर्षांत निरनिराळे प्रयोग करून महाराष्ट्रांतील फळापासून कोणत्या गोष्टी धंदा या स्वरूपांत यशस्वी होतील याबाबत प्रयोग करून त्यास लागणारी यंत्रसामग्रीही तेथें तयार करवून फळापासून टिकाऊ पदार्थ करण्यास यश मिळविलें. व यंदा १९४५ अखेर अशा रीतीनें तयार केलेला पदार्थ विकून रु. २००० पर्यंत धंद्यात नफा मिळविला. याच अवधींत कंपनीच्या मालकीची जमीन खरेदी करून त्यांत सुमारें ५ हजार केळीच्या झाडांची लागवड करण्यांत आली. सुमारें ३५०० संत्री मोसंबी आदिकरून झाडें लावण्यांत येत आहेत. विहीर खणून त्यास उत्कृष्ट पाणी लागलें आहे व त्यावर पत्राचे उन्हाळ्यांत ३ इंची पंप दररोज १० ते १२ तास पर्यंत चालत होता. आतां त्या विहिरींवर १५ हॉर्स पॉवरचें इंजिन बसविण्याचें काम चालूं आहे. अशा रीतीनें निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रगती चालू आहे. १९४६ जून अखेर सुमारें ३०००० रुपये किंमतीच्या मालाची विक्री झाली आहे. साहजिकच कंपनीच्या कामाचा व्याप वाढत आहे.. यासाठी कंपनीकडून कांहीं ठेवी घेण्यांत येत आहेत. नेहमीच्या दरानें किमान तीन वर्षांच्या ठेवी कंपनी स्वीकारणार आहे. किमान ५०० रुपयांच्या लांब मुदतीच्या (१० वर्षें) ठेवीवर ४ टक्के व्याज व कांहीं विशेष तारण देण्यांत येणार आहे. हे तारण श्री. आपटे यांचे नांवचा ५०००० रुपयांचा विमा उतरण्यांत आला आहे त्यावर तेवढ्या रकमेचा क्लेम नोंदून देण्यांत येणार आहे. ही गोष्ट ठेवीदारास विशेष महत्त्वाची आहे. पत्रव्यवहार रुरल प्रॉडक्टस कं. लि. ९५२ सदाशिव, पो. बॉ. नं. ३३ पुणें २ या पत्त्यावर करावा.

## व्यापारी वर्गांस व इतरांस इशारा

( श्री. डब्ल्यू. डी. साळुंके, असि. रजिस्ट्रार, यांजकडून )

जुन्नर, आंबेगांव, इंदापूर, दौंड, शिरूर, खेड तालुक्यांतील ज्या कर्जदारांवर मुंबई कर्जनिवारण कायद्याप्रमाणें दावा चालू आहे, अगर लवादनिवाडा झाला आहे, त्यांना सहकारी संस्था, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक अगर मेन डेपो यांमार्फत पिकासाठीं कर्ज देण्यांत आलें आहे, अशा कर्जदारांचें उभें पीक पिकासाठीं कर्ज देणाऱ्या संस्थेच्या को. सोसायट्या. मेन डेपो अगर पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक यांचे परवानगीशिवाय त्यांना सदरचे कायद्याचे कलम ७७ अन्वयें विकतां येणार नाहीं व तसें त्यांनीं केल्यास ती विक्री अगर तो बोजा बेकायदेशीर ठरेल. तसेंच जो कोणी आपला शेतीचा माल अगर उभें पीक या कायद्याविरुद्ध विक्री करील अगर त्यावर बोजा निर्माण करील तो या कायद्यान्वयें गुन्हेगार ठरेल किंवा जो कोणी जाणून बुजून अशी खरेदी करील किंवा आपल्या वर्तनानें सदर मालावर अगर उभे पिकावर बोजा निर्माण करून देईल तो गुन्हेगार ठरेल व असा गुन्हेगार ६ महिनेपर्यंत शिक्षेस किंवा रुपये ५०० पर्यंत दंडास पात्र होईल. तरी सर्व लोकांना जाहीर करण्यांत येतें कीं, पिकासाठीं कर्ज घेतलेल्या शेतकरी कर्जदाराचा माल अगर उभें पीक कर्ज देणाऱ्या संस्थेच्या लेखी परवानगीशिवाय खरेदी अगर विक्री करूं नये अगर त्यावर बोजा निर्माण करूं नये. जो. कोणी अशी खरेदी अगर विक्री करील अगर बोजा निर्माण करील, तो तें कृत्य आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर करील.

---

सहकारी औद्योगिक संघटना समितीनें श्री. व्ही. डब्ल्यू. चेंबूरकर, बी. ई. यांना मुंबई प्रांतातील निरनिराळ्या औद्योगिक सहकारी संस्थांना तांत्रिक बाबतींत ( Technical ) मार्गदर्शन, मदत व सल्ला देण्याकरितां इंजिनिअर म्हणून नेमलें आहे. औद्योगिक सहकारी संस्थांमध्यें मुंबई प्रांतांतील उत्पादन करणाऱ्या सर्व सहकारी संस्थांचा समावेश होतो. मुंबई प्रांताचे मध्यविभागांतील उत्पादक संस्था व कारखाने वगैरे चालविण्याचा धंदा हातीं घेतलेल्या संस्थासुद्धां सर्व औद्योगिक संस्थांनीं श्री. चेंबूरकर यांची आपल्या तांत्रिक गोष्टींमध्यें सुधारणा घडवून आणण्यासाठीं व तत्सम अडचणी दूर करण्यासाठीं अवश्य मदत व सल्ला घ्यावी अशी विनंति आहे.


पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा:-(१) को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रिअल आर्गनायझेशन कमिटी, ९ बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई, (२) श्री. एन. व्ही. नायक, डेप्युटी रजिस्ट्रार को. सो. मध्यभाग, नाशिक.

---

**कराराची मर्यादा**—मणीलाल शहा व दुसरा एक यांनीं पीरभाई विश्राम यांस सान्ताक्रूझ येथील जागा विकण्याचें ठरविलें. २९-८-१८९८ रोजीं झालेल्या दोन बोहऱ्यांमधील करारान्वयें असें ठरलें होतें कीं, जर जागा विकावयाची ठरली तर ती दुसऱ्या कोणास न विकतां दाउदी बोहराजातींतील बोहऱ्यासच विकावी. सध्यांच्या हिंदुमालकांनीं ती जागा बोहऱ्यांकडून खरीदली होती. तेव्हां वादी पीरभाई यानें असें मांडिलें कीं प्रतिवादी हिंदू असल्यामुळें पूर्वखरेदी चुकीची असून त्यांची मालकी स्थापित होत नाहीं. मुंबई हायकोर्टानें असें सांगितलें कीं हा करार १८९८ मध्यें जागा खरेदी करणारासच लागूं होता, व त्याचा फायदा तिसऱ्या कोणास तरी मिळावा म्हणून तो केलेला नव्हता. तेव्हां जागेच्या मालकीसंबंधीं कोणतीच अडचण उत्पन्न होत नाहीं.

**पिकांच्या किडीवर नवा उपाय**—ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं युद्धकालांत गॅमेक्सेन नांवाचें एक कीटक-नाशक औषध शोधून काढलें असून या औषधाचा उपयोग हिंदुस्थानांतील शेतांतील पिकावर पडणाऱ्या किडीवर करण्यांत येणार आहे. या औषधाची धुरी पिकांना देण्यांत आली तर कीड मरून जाते असें आढळून आलें आहे. हिंदुस्थानांतील दुष्काळी परिस्थितींत तेरावा महिना टाळण्यासाठीं या औषधाचा फार उपयोग होईल.


**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
**पैसा व ज्ञान मिळवा !**

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधिश व्हा ! किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पुना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :—

डोके दुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज
**रामतीर्थ ब्राह्मी तेल** [स्पेशल नं. १]
यानें केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टकलावर केस उगवतात, शांत झोप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.



१ पौं. बाटली रु. ३-८-०
८ औं. बाटली रु. २-०-०
( ट. ख. निराळा.)
प्रत्येक दुकानदाराकडे मिळतें.
श्री रामतीर्थ योगाश्रम
४४८, सँडहर्स्ट रोड, मुंबई ४.
मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.